महाराष्ट्र गट-ब (अराजपत्रित) सेवा संयुक्त मुख्य परीक्षा-२०२४
पेपर क्रमांक-२, दि. २९ जून, २०२५

**2024**

**O20**

| प्रश्नपुस्तिका क्रमांक BOOKLET NO. |
| --- |
| 308477 |

संच क्र. **A**

# प्रश्नपुस्तिका – II
# सामान्य अध्ययन व बुद्धीमत्ता चाचणी

**एकूण प्रश्न : 100**
**एकूण गुण : 200**

**वेळ : 1 (एक) तास**

## सूचना

(1) सदर प्रश्नपुस्तिकेत **100** अनिवार्य प्रश्न आहेत. उमेदवारांनी प्रश्नांची उत्तरे लिहिण्यास सुरुवात करण्यापूर्वी या प्रश्नपुस्तिकेत सर्व प्रश्न आहेत किंवा नाहीत याची खात्री करून घ्यावी. तसेच अन्य काही दोष आढळल्यास ही प्रश्नपुस्तिका समवेक्षकांकडून लगेच बदलून घ्यावी.

(2) आपला परीक्षा-क्रमांक ह्या चौकोनांत **न विसरता बॉलपेनने** लिहावा.

परीक्षा-क्रमांक [ ][ ][ ][ ][ ][ ][ ][ ]
केंद्राची संकेताक्षरे — शेवटचा अंक

(3) वर छापलेला प्रश्नपुस्तिका क्रमांक तुमच्या उत्तरपत्रिकेवर विशिष्ट जागी उत्तरपत्रिकेवरील सूचनेप्रमाणे **न विसरता नमूद करावा.**

(4) (अ) या प्रश्नपुस्तिकेतील प्रत्येक प्रश्नाला 4 पर्यायी उत्तरे सुचविली असून त्यांना 1, 2, 3 आणि 4 असे क्रमांक दिलेले आहेत. त्या चार उत्तरांपैकी सर्वात योग्य उत्तराचा क्रमांक उत्तरपत्रिकेवरील सूचनेप्रमाणे तुमच्या उत्तरपत्रिकेवर नमूद करावा. अशा प्रकारे उत्तरपत्रिकेवर उत्तर-क्रमांक नमूद करताना तो संबंधित प्रश्न-क्रमांकासमोर छायांकित करून दर्शविला जाईल याची काळजी घ्यावी. **ह्याकरिता फक्त काळ्या शाईचे बॉलपेन वापरावे, पेन्सिल वा शाईचे पेन वापरू नये.**

(ब) **आयोगाने ज्या विषयासाठी मराठी बरोबर इंग्रजी माध्यम विहित केलेले आहे. त्या विषयाचा प्रत्येक प्रश्न मराठी बरोबर इंग्रजी भाषेत देखील छापण्यात आला आहे. त्यामधील इंग्रजीतील किंवा मराठीतील प्रश्नामध्ये मुद्रणदोषांमुळे अथवा अन्य कारणांमुळे विसंगती निर्माण झाल्याची शंका आल्यास, उमेदवाराने संबंधित प्रश्न पर्यायी भाषेतील प्रश्नाशी ताडून पहावा.**

(5) सर्व प्रश्नांना समान गुण आहेत. यास्तव सर्व प्रश्नांची उत्तरे द्यावीत. घाईमुळे चुका होणार नाहीत याची दक्षता घेऊनच शक्य तितक्या वेगाने प्रश्न सोडवावेत. क्रमाने प्रश्न सोडविणे श्रेयस्कर आहे पण **एखादा प्रश्न कठीण वाटल्यास त्यावर वेळ न घालविता पुढील प्रश्नांकडे वळावे.** अशा प्रकारे शेवटच्या प्रश्नापर्यंत पोहोचल्यानंतर वेळ शिल्लक राहिल्यास कठीण म्हणून वगळलेल्या प्रश्नांकडे परतणे सोईस्कर ठरेल.

(6) उत्तरपत्रिकेत एकदा नमूद केलेले उत्तर खोडता येणार नाही. नमूद केलेले उत्तर खोडून नव्याने उत्तर दिल्यास ते तपासले जाणार नाही. एकापेक्षा जास्त उत्तरे नमूद केल्यास ते उत्तर चुकीचे धरले जाईल व त्या चुकीच्या उत्तराचे गुण वजा केले जातील.

(7) **प्रस्तुत परीक्षेच्या उत्तरपत्रिकांचे मूल्यांकन करताना उमेदवाराच्या उत्तरपत्रिकेतील योग्य उत्तरांनाच गुण दिले जातील. तसेच "उमेदवाराने वस्तुनिष्ठ बहुपर्यायी स्वरूपाच्या प्रश्नांची दिलेल्या चार उत्तरांपैकी सर्वात योग्य उत्तरेच उत्तरपत्रिकेत नमूद करावीत. अन्यथा त्यांच्या उत्तरपत्रिकेत सोडविलेल्या प्रत्येक चुकीच्या उत्तरांसाठी 25% किंवा 1/4 गुण वजा/कमी करण्यात येतील."**

### ताकीद

**ह्या प्रश्नपुस्तिकेसाठी आयोगाने विहित केलेली वेळ संपेपर्यंत ही प्रश्नपुस्तिका आयोगाची मालमत्ता असून ती परीक्षाकक्षात उमेदवाराला परीक्षेसाठी वापरण्यास देण्यात येत आहे. स्पर्धा परीक्षा घेण्यासाठी, प्राधिकृत केलेली, नेमलेली किंवा कर्तव्ये सोपविलेली कोणतीही व्यक्ती, प्रश्नपुस्तिका उघडण्यासाठी व वितरित करण्यासाठी निश्चित केलेल्या वेळेपूर्वी अशी प्रश्नपत्रिका किंवा तिचा कोणताही भाग किंवा तिची प्रत उघडणार नाही, फोडणार नाही किंवा ताब्यात घेणार नाही किंवा पाहणार नाही किंवा सोडविणार नाही किंवा सोडविण्यास सहाय्य करणार नाही; असे केल्यास "महाराष्ट्र स्पर्धा परीक्षा (अनुचित मार्गांस प्रतिबंध) अधिनियम-२०२४" मधील तरतुदीनुसार सदर व्यक्ती तीन वर्षापेक्षा कमी नसेल परंतु, जी पाच वर्षापर्यंत वाढविता येईल इतक्या मुदतीची कारावासाची शिक्षा आणि दहा लाख रुपयांपर्यंतच्या द्रव्यदंडास पात्र होईल. तसेच ह्या प्रश्नपुस्तिकेसाठी आयोगाने विहित केलेली वेळ संपण्याआधी ही प्रश्नपुस्तिका अनधिकृतपणे बाळगणे हा सुद्धा गुन्हा असून तसे करणारी व्यक्ती आयोगाच्या कर्मचारीवृंदापैकी, तसेच परीक्षेच्या पर्यवेक्षकीयवृंदापैकी असली तरीही अशा व्यक्तीविरुद्ध उक्त अधिनियमानुसार कारवाई करण्यात येईल व दोषी व्यक्ती शिक्षेस पात्र होईल.**

**पुढील सूचना प्रश्नपुस्तिकेच्या अंतिम पृष्ठावर पहा.**

पर्यवेक्षकांच्या सूचनेविना हे सील उघडू नये

कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK

**1.** खालीलपैकी कोणते इतरांपेक्षा वेगळे आहे ?
मीटर, यार्ड, मैल, एकर

(1) मीटर (2) यार्ड (3) मैल (4) एकर

Which of the following is different from the others ?
Meter, Yard, Mile, Acre

(1) Meter (2) Yard (3) Mile (4) Acre

---

**2.** प्रश्नातील संख्या मालिकेत प्रश्न चिन्हांच्या जागी काय येईल ?

100, 81, 64, 51, ?, 33

(1) 36 (2) 40 (3) 49 (4) 42

What will come in the place of question mark in the number series of the question ?

100, 81, 64, 51, ?, 33

(1) 36 (2) 40 (3) 49 (4) 42

---

**3.** दिलेल्या आकृतीतील संख्या विशिष्ट नियमांचे पालन करतात. दिलेल्या पर्यायांमधून अशी संख्या शोधा जी प्रश्नार्थक चिन्हाच्या ठिकाणी येईल.




(1) 10 (2) 13 (3) 15 (4) 12

The numbers in the given diagram follows the specific rule. Find out the number from the given options which will come in the place of the question mark.




(1) 10 (2) 13 (3) 15 (4) 12

**4.** खालील संख्या श्रेणी पूर्ण करा.

37, 36, 37, 34, 37, 32, 37, ___, ___

(1) 31, 37 (2) 37, 31 (3) 36, 31 (4) 30, 37

Complete the following number series.

37, 36, 37, 34, 37, 32, 37, ___, ___

(1) 31, 37 (2) 37, 31 (3) 36, 31 (4) 30, 37

---

**5.** दिलेली आकृती एका महाविद्यालयातील विविध खेळाडूंचे प्रतिनिधित्व करते. चौरस फुटबॉल खेळाडूंचे प्रतिनिधित्व करतो. त्रिकोण क्रिकेट खेळाडूंचे प्रतिनिधित्व करतो आणि वर्तुळ कबड्डी खेळाडूंचे प्रतिनिधित्व करतो. आकृतीचे काळजीपूर्वक निरीक्षण करून पुढील प्रश्नाचे उत्तर द्या.

कबड्डी व क्रिकेट हे दोन्ही खेळ खेळणारे परन्तु फुटबॉल न खेळणारे खेळाडू आणि फक्त क्रिकेट खेळणाऱ्या खेळाडूंचे गुणोत्तर किती ?




(1) 1 : 2 (2) 2 : 1 (3) 7 : 5 (4) 5 : 7

The given diagram represents various players in a college. The square represents the football players. Triangle represents cricket players and circle represents kabaddi players. Observe the figure carefully and answer the following question.

What is the ratio of players who play both kabaddi and cricket but not football to players who only play cricket ?




(1) 1 : 2 (2) 2 : 1 (3) 7 : 5 (4) 5 : 7

---

**6.** सचिन उत्तरेकडे तोंड करून उभा आहे. तो सरळ 10 किमी चालतो, उजवीकडे वळतो व 4 किमी चालतो, परत उजवीकडे वळून 15 किमी चालतो व शेवटी उजवीकडे वळून 16 किमी चालतो. आता तो आपल्या मूळ स्थानापासून किती अंतरावर आहे ?

(1) 13 किमी (2) 45 किमी (3) 15 किमी (4) 17 किमी

Sachin is standing facing North. He walks 10 km straight, turns right and walks 4 km, then turns right and walks 15 km and finally turns right and walks 16 km. How far is he from his original place ?

(1) 13 km (2) 45 km (3) 15 km (4) 17 km

---

**7.** खालीलपैकी कोणती वेन आकृती 'व्यावसायिक', 'वकील' आणि 'न्यायाधीश' यांच्यामधील योग्य संबंध दर्शविते ?

(1) 

(2) 

(3) 

(4) 

Which of the following Venn diagram indicates the appropriate relation between 'Professionals', 'Lawyers' and 'Judges' ?

(1) 

(2) 

(3) 

(4) 

---

**8.** खालील गणितीय पदावलीचे मूल्य शोधा ज्यामध्ये विशिष्ट क्रमाने येणारी 27 पदे आहेत.

$3 + 5 - 6 + 2 - 4 + 3 + 5 - 6 + 2 - 4 + 3 + 5 - 6$ ...........

(1) −6 (2) 8 (3) 2 (4) 9

Find the value of following Mathematical expression which has 27 terms in the specific order.

$3 + 5 - 6 + 2 - 4 + 3 + 5 - 6 + 2 - 4 + 3 + 5 - 6$ ...........

(1) −6 (2) 8 (3) 2 (4) 9

---

9. खालील अक्षर श्रेणी पूर्ण करा.

ODE, PFG, QHI, _____, SLM

(1) RJK (2) TJL (3) NCD (4) MAB

Complete the following letter series.

ODE, PFG, QHI, _____, SLM

(1) RJK (2) TJL (3) NCD (4) MAB

10. एका मुलीने एका मुलाची ओळख तिच्या काकांच्या वडीलांच्या मुलीचा मुलगा म्हणून करून दिली. तर मुलगा आणि मुलीचे नाते संबंध : __________.

(1) भाऊ (2) मुलगा

(3) काका (4) भाचा

A girl introduced a boy as the son of the daughter of the father of her uncle. The boy and girl's relation : ___________.

(1) Brother (2) Son

(3) Uncle (4) Nephew

11. खालीलपैकी योग्य विधाने निवडा.

अ. आयुष मंत्रालयाने 'विश्व होमियोपॅथी दिन' 10 एप्रिल 2024 रोजी साजरा केला.

ब. 10 व्या आंतरराष्ट्रीय योग दिवस, 2024 ची थीम 'राष्ट्र-निर्मितीसाठी योग' ही होती.

क. आयुष मंत्रालयाने 11 फेब्रुवारी, 2024 रोजी युनानी दिन, 2024 साजरा केला.

(1) फक्त अ, ब (2) फक्त ब, क

(3) फक्त अ, क (4) वरीलपैकी सर्व

Select the correct statements from the following.

A. The Ministry of Ayush commemorated 'World Homeopathy Day' on April 10, 2024.

B. The theme of $10^{th}$ International Day of Yoga, 2024 was 'Yoga for Nation-Building'.

C. The Ministry of Ayush celebrated the Unani Day, 2024 on $11^{th}$ February, 2024.

(1) Only A, B (2) Only B, C

(3) Only A, C (4) All of the above

कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK

12. खालीलपैकी कोणता खेळाडू भारतीय ॲथलेटिक्स महासंघाच्या ॲथलिटस् कमिशनचा सदस्य नाही ?

(1) मनु भाकर (2) ज्योतिर्मयी सिकदार
(3) सुधा सिंग (4) सुनिता रानी

Who among the following players is not a member of Athletes Commission of Athletics Federation of India ?

(1) Manu Bhaker (2) Jyotirmoyee Sikdar
(3) Sudha Singh (4) Sunita Rani

13. जोड्या लावा - (नोबेल पुरस्कार, 2024).

| 'अ' | | 'ब' | |
|---|---|---|---|
| अ. | भौतिकशास्त्र | i. | डेविड बेकर |
| ब. | रसायनशास्त्र | ii. | जॉन जे. हॉपफिल्ड |
| क. | शरीर विज्ञान | iii. | हॅन कँग |
| ड. | साहित्य | iv. | विक्टर ॲम्ब्रोस |

| | अ | ब | क | ड |
|---|---|---|---|---|
| (1) | ii | i | iv | iii |
| (2) | i | iv | iii | ii |
| (3) | iii | ii | i | iv |
| (4) | i | ii | iii | iv |

Match the pairs – (Nobel Prize, 2024).

| 'A' | | 'B' | |
|---|---|---|---|
| A. | Physics | i. | David Baker |
| B. | Chemistry | ii. | John J. Hopfield |
| C. | Physiology | iii. | Han Kang |
| D. | Literature | iv. | Victor Ambros |

| | A | B | C | D |
|---|---|---|---|---|
| (1) | ii | i | iv | iii |
| (2) | i | iv | iii | ii |
| (3) | iii | ii | i | iv |
| (4) | i | ii | iii | iv |

**14.** रतन टाटांना मिळालेल्या पुरस्काराबाबत खालीलपैकी कोणते विधान/ने चुकीचे आहे/त ?

अ. त्यांना 2000 मध्ये पद्मभूषण पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

ब. त्यांना 2008 मध्ये पद्मविभूषण पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

क. त्यांना 2023 मध्ये उद्योग रत्न पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

ड. ते नोबेल पारितोषिक विजेते आहेत.

(1) फक्त अ (2) फक्त ब आणि क (3) फक्त ड (4) फक्त क

Which of the following statement/s regarding the awards received by Ratan Tata is/are incorrect ?

a. He was honoured with the Padma Bhushan Award in 2000.

b. He was honoured with the Padma Vibhushan Award in 2008.

c. He was honoured with the Udyog Ratna Award in 2023.

d. He is a Nobel Prize Laureate.

(1) Only a (2) Only b and c (3) Only d (4) Only c

---

**15.** खाली दिलेल्यापैकी भारतीय निवडणूक आयोगाने विकसित केलेल्या कोणत्या माहिती आणि संप्रेषण तंत्रज्ञानावर आधारित ॲपच्या सहाय्याने नागरिक आदर्श आचार संहितेच्या भंगाच्या किंवा खर्चाच्या मर्यादांच्या भंगासंबंधी तक्रार दाखल करू शकतात ?

(1) के.वाय.सी.-ई.सी.आय. (2) एनकोर नोडल ॲप

(3) सी-व्हिजील (4) सुविधा कँडिडेट

Which of the following ICT apps developed by Election Commission of India enables the citizens to file complaint against the violation of Model Code of Conduct or violation of expenditure limit ?

(1) KYC – ECI (2) Encore Nodal App

(3) c-VIGIL (4) Suvidha Candidate

---

**16.** 'आंबेडकर : अ लाईफ' या पुस्तकाचे लेखक कोण आहेत ?

(1) शशी थरूर (2) हरी नरके

(3) नरेंद्र जाधव (4) जयराम रमेश

Who is the author of the book 'Ambedkar : A Life' ?

(1) Shashi Tharoor (2) Hari Narke

(3) Narendra Jadhav (4) Jayram Ramesh

---

**कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK**

A

17. खालीलपैकी कोणत्या एजन्सीने 'नो युअर मेडीसिन' ॲप लाँच केले आहे ?
(1) वर्ल्ड ॲन्टी डोपिंग एजन्सी
(2) नॅशनल ॲन्टी डोपिंग एजन्सी
(3) ऑल इंडिया इन्स्टिट्यूट ऑफ मेडिकल सायन्सेस
(4) इंडियन कॉन्सिल ऑफ मेडिकल रिसर्च

Which of the following agency has launched 'Know Your Medicine' app ?
(1) World Anti Doping Agency
(2) National Anti Doping Agency
(3) All India Institute of Medical Sciences
(4) Indian Council of Medical Research

18. एम.एस. स्वामीनाथन यांच्याबाबत खालीलपैकी कोणते विधान खरे नाही ?
(1) 1971 मध्ये त्यांना रॅमन मॅगसेसे पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.
(2) त्यांनी आंतरराष्ट्रीय तांदूळ संशोधन संस्था, फिलिपिन्स चे प्रमुखपद भूषविले.
(3) त्यांना 2004 मध्ये राष्ट्रीय शेतकरी आयोगाचे अध्यक्ष म्हणून नियुक्त करण्यात आले.
(4) त्यांना 1988 मध्ये प्रथम जागतिक अन्न पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

Which of the following statement is not true about M.S. Swaminathan ?
(1) He was honoured with Raman Magasaysay Award in 1971.
(2) He headed the International Rice Research Institute, Philippines.
(3) He was appointed as Chairman of National Commission on Farmers in 2004.
(4) He was honoured with First World Food Prize in 1988.

19. युथसॅट (YouthSat) हे कोणत्या देशांचे संयुक्त उपग्रह मिशन आहे ?
(1) EU – अमेरीका
(2) भारत – फ्रान्स
(3) रशिया – चीन
(4) भारत – रशिया

YouthSat is joint satellite mission of which countries ?
(1) EU – America
(2) India – France
(3) Russia – China
(4) India – Russia

**20.** घानाचे नवनिर्वाचित अध्यक्ष जॉन महामा खालीलपैकी कोणत्या राजकीय पक्षाचे सदस्य आहेत ?

(1) कन्व्हेन्शन पीपल्स पार्टी (सी.पी.पी.)

(2) पीपल्स नॅशनल पार्टी (पी.एन.पी.)

(3) नॅशनल डेमोक्रॅटिक काँग्रेस (एन.डी.सी.)

(4) न्यू पॅट्रिओटीक पार्टी (एन.पी.पी.)

Newly elected Ghana's President John Mahama is member of which of the following political party ?

(1) Convention Peoples Party (CPP)

(2) Peoples National Party (PNP)

(3) National Democratic Congress (NDC)

(4) New Patriotic Party (NPP)

---

**21.** जर घड्याळात सकाळचे 8 तास व 20 मिनिटे झाले असतील तर तास काटा व मिनिट काटा यांमधील कोन किती अंशाचा असेल ?

(1) 130° (2) 75°

(3) 110° (4) 120°

If it is 8 hours and 20 minutes in the morning on the clock, then what is angle between the hour hand and the minute hand ?

(1) 130° (2) 75°

(3) 110° (4) 120°

---

**22.** 60 लीटर मिश्रणात रंग व पाणी 3 : 2 प्रमाणात आहेत. किती लीटर पाणी घातल्यास प्रमाण 3 : 5 होईल ?

(1) 10 लीटर (2) 36 लीटर

(3) 15 लीटर (4) 25 लीटर

A 60 litre mixture has color and water in the ratio 3 : 2. How much litre water should be added to make the ratio 3 : 5 ?

(1) 10 litres (2) 36 litres

(3) 15 litres (4) 25 litres

---

**कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK**

**23.** खालील आलेखाचे अवलोकन करून खालील प्रश्नाचे उत्तर द्या.

बार-आलेखातील बार A, B, C व D कंपन्यांनी दोन वेगवेगळ्या महिन्यात एप्रिल व मे मध्ये विकलेल्या लॅपटॉप चे यूनिट दाखवतात.

Study the graph carefully and answer the question below.

The bar graph shows the units of Laptops sold by A, B, C and D Companies in the two different months April and May.




| कंपनी Company | A | B | C | D |
|---|---|---|---|---|
| (एप्रिल) April | 600 | 1200 | 1000 | 400 |
| (मे) May | 1200 | 960 | 800 | 1000 |

मे महिन्यात C व D दोन्ही कंपन्यांनी मिळून विकलेले लॅपटॉप हे एप्रिल मध्ये कंपनी B ने विकलेल्या लॅपटॉप पेक्षा किती टक्के जास्त आहेत ?

(1) 90% (2) 50%

(3) 30% (4) 20%

Laptops sold by Companies C and D together in May are more than laptops sold by Company B in April by what percent ?

(1) 90% (2) 50%

(3) 30% (4) 20%

**24.** खालील स्तंभालेखात एका शाळेची 3 वर्षांची विद्यार्थी संख्या दर्शविली आहे. तर 2002 साली मुलांची संख्या मुलींची संख्येपेक्षा कितीने जास्त आहे ?




(1) 200 (2) 100

(3) 400 (4) 300

Following Histogram shows student strength of school in three years. How many more boys than girls in the year 2002 ?




(1) 200 (2) 100

(3) 400 (4) 300

खाली दिलेला वर्तुळालेख एका गावातील जमीनीतील अन्नपिकांची विभागणी दर्शवितो. वर्तुळालेखाचा काळजीपूर्वक अभ्यास करून खालील प्रश्न क्र. **25** व **26** ची उत्तरे द्या.

The distribution of land in a village under various food crops is represented by the pie-chart given below. Study the pie-chart carefully and answer the question no. **25** and **26**.




**25.** जर तांदळाचे प्रती एकरी उत्पन्न गव्हापेक्षा 50% अधिक असेल तर गव्हाचे उत्पन्न हे तांदळाच्या किती टक्के आहे ?

(1) 30% (2) 35% (3) 36% (4) $33\frac{1}{3}\%$

If the yield per acre of rice is 50% more than that of wheat, then the production of wheat is what percent of that of rice ?

(1) 30% (2) 35% (3) 36% (4) $33\frac{1}{3}\%$

**26.** जर अन्नपिकांचे एकूण क्षेत्र 5% वाढले व तांदळाचे उत्पन्न क्षेत्र 12% ने वाढले तर नवीन वर्तुळालेखामध्ये तांदळाचा कोन किती असेल ?

(1) 76.8° (2) 62.4° (3) 80.6° (4) 84.2°

If the total area of food crop increased by 5% and the area under rice production increased by 12%, then what will be the angle for rice in the new pie-chart ?

(1) 76.8° (2) 62.4° (3) 80.6° (4) 84.2°

**27.** जर एक आगगाडी नेहमीच्या तिच्या ताशी 80 किमी वेगा ऐवजी ताशी 100 किमी वेगाने धावल्यास, ती निर्धारित ठिकाणी 36 मिनिट लवकर पोहचते, तर तिच्या गंतव्य स्थानाचे अंतर किती ?

(1) 240 किमी (2) 260 किमी (3) 300 किमी (4) 250 किमी

If a train with usual speed of 80 km/hr increases its speed to 100 km/hr, then reaches its destination 36 minutes earlier. Then how far is the destination ?

(1) 240 km (2) 260 km (3) 300 km (4) 250 km

---

**28.** दोन कार एकाच दिशेने 80 km/hr व 70 km/hr वेगाने जात आहेत. किती वेळानंतर त्या दोन कार एकमेकांपासून 60 km अंतरावर राहतील ?

(1) 6 तास (2) 7 तास (3) 8 तास (4) 9 तास

If two cars moving in the same direction with speed 80 km/hr and 70 km/hr, after how much time, both cars will be at a distance 60 km from each other ?

(1) 6 hr (2) 7 hr (3) 8 hr (4) 9 hr

---

**29.** दोन संख्यांचे म.सा.वि. आणि ल.सा.वि. अनुक्रमे 24 आणि 168 आहे. दोन्ही संख्या 1 : 7 या प्रमाणात आहे. तर दोन्ही मधील मोठी संख्या शोधा.

(1) 168 (2) 144 (3) 108 (4) 72

The HCF and LCM of two numbers are respectively 24 and 168. Both the numbers are in the ratio 1 : 7. Find the greater of the two numbers.

(1) 168 (2) 144 (3) 108 (4) 72

---

**30.** 30% विद्यार्थी सकाळ वृत्तपत्र वाचतात आणि 40% विद्यार्थी लोकमत वृत्तपत्र वाचतात, जर 15% विद्यार्थी दोन्ही वृत्तपत्र वाचत असतील तर किती टक्के विद्यार्थी कुठलेच वृत्तपत्र वाचत नाहीत ?

(1) 20% (2) 30% (3) 45% (4) 55%

30% students read Sakal newspaper and 40% students read Lokmat newspaper, if 15% students read both newspapers, then what percentage of students do not read any newspaper ?

(1) 20% (2) 30% (3) 45% (4) 55%

---

**31.** जर एक व्यक्ती रु. 50 प्रमाणे 20 समभाग रु. 5 च्या सवलतीने खरेदी करतो व त्यावर $13\frac{1}{2}\%$ लाभांश असेल तर मिळालेले व्याजाचा दर असेल _______________.

(1) $13\frac{1}{2}\%$ (2) 15% (3) 17% (4) 16%

If a man bought 20 shares of Rs. 50 at Rs. 5 discount and the rate of dividend being $13\frac{1}{2}\%$. Then the rate of interest obtained would be _______________.

(1) $13\frac{1}{2}\%$ (2) 15% (3) 17% (4) 16%

---

कच्च्या कामासाठी जागा / **SPACE FOR ROUGH WORK**

**32.** 7 पुरुष किंवा 10 महिला एक 100 मीटरची भिंत 10 दिवसात बांधतात. 600 मीटरची भिंत बांधण्यासाठी 14 पुरुष व 20 महिला किती दिवस घेतील ?

(1) 15 (2) 20 (3) 25 (4) 30

A wall of 100 meter can be built by 7 men or 10 women in 10 days. How many days will 14 men and 20 women take to built a wall of 600 meters ?

(1) 15 (2) 20 (3) 25 (4) 30

---

**33.** **विधान I** : महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, 2015 अंतर्गत "निर्धारित वेळ मर्यादा" म्हणजे कलम 4 अंतर्गत अधिसूचित केलेली वेळ मर्यादा.

**विधान II** : निवडणुकीच्या काळात राज्य सरकारकडून ही निर्धारित वेळ मर्यादा वाढविता येते.

योग्य पर्याय निवडा.

(1) विधान I बरोबर, विधान II चूक आहे

(2) विधान II बरोबर, विधान I चूक आहे

(3) दोन्ही विधाने बरोबर आहेत

(4) दोन्ही विधाने चूक आहेत

**Statement I** : Under the Maharashtra Right to Public Services Act, 2015, 'Stipulated time limit' means the time limit as notified under Section 4.

**Statement II** : The stipulated time limit may be extended by the State Government during the period of election.

Choose the correct option :

(1) Statement I is correct, statement II is incorrect

(2) Statement II is correct, statement I is incorrect

(3) Both the statements are correct

(4) Both the statements are incorrect

---

**34.** महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, 2015 चे खालीलपैकी कोणते कलम महाराष्ट्र राज्य सेवा हक्क आयोगाचे अधिकार आणि कार्ये यांच्याशी संबंधित आहेत ?

(1) कलम 12 (2) कलम 14 (3) कलम 15 (4) कलम 16

Which amongst the following Section of the Maharashtra Right to Public Service Act, 2015 deals with the powers and functions of the Maharashtra State Right to Service Commission ?

(1) Section 12 (2) Section 14 (3) Section 15 (4) Section 16

---

35. माहितीचा अधिकार अधिनियम, 2005 मधील कलम ________ नुसार सार्वजनिक प्राधिकरणांची सर्व माहिती व्यापकपणे आणि अशा स्वरूपात आणि पद्धतीने प्रसारित केली जाईल की जी जनतेला सहज उपलब्ध होईल.

(1) कलम 3(1) (2) कलम 4(1) (3) कलम 4(2)(अ) (4) कलम 4(3)

As per Section ____________ of the Right to Information Act, 2005, every information of public authorities shall be disseminated widely and in such form and manner which is easily accessible to the public.

(1) Section 3(1) (2) Section 4(1) (3) Section 4(2)(A) (4) Section 4(3)

---

36. खालीलपैकी कोणते कर्तव्य भारतीय संविधानात समाविष्ट केलेल्या मूलभूत कर्तव्यांपैकी एक नाही ?

(1) संविधानाचे पालन करणे
(2) भारतीय लोकांमध्ये सामंजस्य वाढवणे
(3) वेळेवर कर भरणे
(4) नैसर्गिक पर्यावरणाचे रक्षण करून त्यात सुधारणा करणे

Which of the following duties is not one of the Fundamental Duties included in the Indian Constitution ?

(1) To abide by the Constitution
(2) To promote harmony amongst the people of India
(3) To pay taxes promptly
(4) To protect and improve the natural environment

---

37. भारतीय सर्वोच्च न्यायालयाच्या कोणत्या ऐतिहासिक निकालाने इतर मागास वर्गांतर्गत ''क्रीमी लेयर'' ही संकल्पना मांडली ?

(1) इंद्रा साहनी वि. भारत सरकार
(2) अशोक कुमार ठाकूर वि. भारत सरकार
(3) एम. नागराज वि. भारत सरकार
(4) केशवानंद भारती वि. केरल राज्य

Which landmark judgement of Supreme Court of India introduced the concept of "creamy layer" within the Other Backward Classes (OBCs) ?

(1) Indra Sawhney V. Union of India
(2) Ashok Kumar Thakur V. Union of India
(3) M. Nagraj V. Union of India
(4) Kesavanand Bharati V. State of Kerala

---

**कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK**

**38.** योग्य जोड्या जुळवा.

| | | | |
|---|---|---|---|
| अ. | विधानसभेचा कार्यकाल | i. | स्थायी सभागृह |
| ब. | ग्रामसभेचा अध्यक्ष | ii. | मुख्यमंत्री |
| क. | विधानपरिषदेचा कार्यकाल | iii. | 5 वर्ष |
| ड. | मंत्रिमंडळाचा प्रमुख | iv. | सरपंच |

| | अ | ब | क | ड |
|---|---|---|---|---|
| (1) | iii | i | iv | ii |
| (2) | iii | iv | i | ii |
| (3) | i | ii | iii | iv |
| (4) | iv | iii | ii | i |

Match the following.

| | | | |
|---|---|---|---|
| a. | Tenure of Vidhan Sabha | i. | Permanent Assembly |
| b. | President of Gram Sabha | ii. | Chief Minister |
| c. | Tenure of Vidhan Parishad | iii. | 5 years |
| d. | Head of the Cabinet | iv. | Sarpanch |

| | a | b | c | d |
|---|---|---|---|---|
| (1) | iii | i | iv | ii |
| (2) | iii | iv | i | ii |
| (3) | i | ii | iii | iv |
| (4) | iv | iii | ii | i |

**39.** भारताच्या भूभागातील सामाजिक आणि शैक्षणिक दृष्ट्या मागासवर्गीयांच्या स्थितीची चौकशी करण्यासाठी आयोग नियुक्त करण्याचा अधिकार संविधानाच्या कोणत्या कलमाद्वारे राष्ट्रपतींना देण्यात आला आहे ?

(1) कलम 339 (2) कलम 340 (3) कलम 342 (4) कलम 344

Which Article of the Constitution empowers the President to appoint a Commission to investigate the condition of socially and educationally backward classes in the territory of India ?

(1) Article 339 (2) Article 340 (3) Article 342 (4) Article 344

40. खालीलपैकी योग्य विधाने निवडा.

अ. प्रत्येक राज्यासाठी एक उच्च न्यायालय असेल.

ब. प्रत्येक उच्च न्यायालय हे अभिलेख न्यायालय असेल आणि त्यास आपल्या अवमानाबद्दल शिक्षा करण्याच्या अधिकारासह अशा न्यायालयाचे सर्व अधिकार असतील.

क. प्रत्येक उच्च न्यायालय हे मुख्य न्यायमूर्ती व राज्यपालाला वेळोवेळी जे नियुक्त करणे आवश्यक वाटतील असे अन्य न्यायाधीश यांनी मिळून बनलेले असेल.

(1) फक्त अ, ब (2) फक्त ब, क (3) फक्त अ, क (4) वरीलपैकी सर्व

Select the correct statements from the following.

A. There shall be a High Court for each State.

B. Every High Court shall be a Court of record and shall have all the powers of such Court including the power to punish for contempt of itself.

C. Every High Court shall consists of a Chief Justice and such other Judges as the Governor may from time to time deem it necessary to appoint.

(1) Only A, B (2) Only B, C (3) Only A, C (4) All of the above

---

41. खालीलपैकी कोणते/ती विधान/ने योग्य आहे/त ?

अ. राज्यपाल हा केंद्र व राज्य सरकारातील दुवा आहे.

ब. राज्यपाल हा राज्य सरकारचा वास्तविक प्रमुख असतो.

क. कलम 153 मध्ये राज्यपाल पदाची तरतुद आहे.

ड. राज्यपालास विधानसभेचे मुदतपूर्व विसर्जन करण्याचा अधिकार आहे.

(1) केवल विधाने अ, ब योग्य आहेत

(2) केवल विधान क योग्य आहे

(3) केवल विधाने अ, क आणि ड योग्य आहेत

(4) फक्त विधान अ योग्य आहे

Which of the following statements is/are correct ?

a. The Governor is the link between State and Centre.

b. The Governor is the defacto head of State.

c. There is a provision of Governor in Article 153.

d. The Governor has the power to dissolve the Legislative Assembly prematurely.

(1) Only statements a, b are correct

(2) Only statement c is correct

(3) Only statements a, c and d are correct

(4) Only statement a is correct

---

कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK

**42.** राज्यपाल पदाच्या नियुक्तीसाठी कोणत्या पात्रता आहेत ?

अ. त्याने वयाची 35 वर्षे पूर्ण केलेली असावी.

ब. तो संसदेच्या कोणत्याही सभागृहाचा किंवा राज्य विधिमंडळाचा सदस्य नसावा.

क. त्याने आर्थिक लाभाचे पद धारण केलेले नसावे.

ड. तो भारताचा नागरिक असावा.

(1) फक्त अ, ब (2) फक्त अ, ब, ड

(3) फक्त अ, क, ड (4) वरीलपैकी सर्व

What are the qualifications for appointment as a Governor ?

A. He must have completed the age of 35 years.

B. He cannot be a member of either House of Parliament or State Legislature.

C. He cannot be hold any other office of profit.

D. He should be citizen of India.

(1) Only A, B (2) Only A, B, D

(3) Only A, C, D (4) All of the above

---

**43.** खालीलपैकी योग्य विधाने ओळखा.

अ. उपराष्ट्रपती हे राज्यसभेचे पदसिद्ध सभापती असतील व ते कोणतेही अन्य लाभाचे पद धारण करणार नाहीत.

ब. उपराष्ट्रपती जेव्हा अनुच्छेद 65 अन्वये राष्ट्रपती म्हणून कार्य करतील किंवा राष्ट्रपतींची कार्ये पार पाडतील, तेव्हा अशा कोणताही कालावधीत ते राज्यसभेच्या सभापती पदाची कर्तव्ये पार पाडणार नाहीत.

क. अशा कोणत्याही कालावधीत, जेव्हा उपराष्ट्रपती हे राष्ट्रपती म्हणून कार्य करतील, तेव्हा अनुच्छेद 97 अन्वये राज्यसभेच्या सभापतींना प्रदेय असलेले कोणतेही वेतन व भत्ते मिळण्यास हक्कदार असेल.

(1) फक्त अ, ब (2) फक्त ब, क

(3) फक्त अ, क (4) वरीलपैकी सर्व

Select the correct statements from the following.

A. The Vice-President shall be ex-officio Chairman of the Council of States and shall not hold any other office of profit.

B. During any period, when the Vice-President acts as President or discharges the functions of the President under Article 65, he shall not perform the duties of the office of Chairman of the Council of States.

C. During any period, when the Vice-President acts as a President, he shall be entitled to salary or allowance payable to the Chairman of the Council of States under Article 97.

(1) Only A, B (2) Only B, C

(3) Only A, C (4) All of the above

---

**44.** खालीलपैकी कोणते विधान कलम 168 शी संबंधित नाही ?

(1) प्रत्येक राज्यासाठी एक कायदेमंडळ असेल ज्यामध्ये राज्यपाल असतील.

(2) बिहार, महाराष्ट्र, कर्नाटक आणि उत्तर प्रदेश या राज्यांमध्ये दोन सभागृहे असतील.

(3) जेथे राज्याच्या कायदेमंडळाची दोन सभागृहे असतील, तेथे एक विधानपरिषद आणि दूसरे विधानसभा म्हणून ओळखले जाईल.

(4) जेथे फक्त एकच सभागृह असेल, तेथे ते विधानपरिषद म्हणून ओळखले जाईल.

Which of the following statements is not related to Article 168 ?

(1) For every State, there shall be a Legislature which shall consist of the Governor.

(2) Bihar, Maharashtra, Karnataka and Uttar Pradesh States have two houses.

(3) Where there are two Houses of the Legislature of the State, one shall be known as the Legislative Council and other as the Legislature Assembly.

(4) Where there is only one House it shall be known as Legislative Council.

---

**45.** कायद्यासमोर समानता या नियमासाठी खालीलपैकी कोणते अपवाद आहेत ?

अ. राष्ट्रपती किंवा राज्यपाल हे त्यांच्या पदाचे अधिकार व कार्य निर्वहनासाठी कोणत्याही न्यायालयाला जबाबदार नसतात.

ब. परदेशी सार्वभौम, राजदूत व राजनैतिक अधिकारी यांना दिवाणी व फौजदारी कारवाईपासून मुक्तता मिळते.

क. संयुक्त राष्ट्र संघटना व त्याची अभिकरणे यांना राजनैतिक विशेषाधिकार प्राप्त आहेत.

(1) फक्त अ, ब (2) फक्त ब, क

(3) फक्त अ, क (4) वरीलपैकी सर्व

Which of the following are exceptions to the rule of equality before law ?

A. The President or the Governor is not answerable to any Court for the exercise and performance of the powers and duties of his office.

B. The foreign sovereign, ambassadors and diplomats enjoy immunity from civil and criminal proceedings.

C. The UNO and its agencies enjoy the diplomatic immunity.

(1) Only A, B (2) Only B, C

(3) Only A, C (4) All of the above

---

**46.** भारतीय राज्यघटनेच्या खालीलपैकी कोणत्या कलमामध्ये राज्य मंत्रीमंडळाच्या सामूहिक जबाबदारीचे तत्व निहित आहे ?

(1) कलम 164 (2) कलम 162 (3) कलम 163 (4) कलम 167

In which of the following Article of the Constitution of India is the principle of collective responsibility of the State Council of Ministers enshrined ?

(1) Article 164 (2) Article 162 (3) Article 163 (4) Article 167

---

कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK

**47.** सर्व राज्यांचे मुख्यमंत्री ____________ चे पदसिद्ध सदस्य आहेत.

(1) नियोजन आयोग
(2) राष्ट्रीय विकास परिषद
(3) आंतरराज्य परिषद
(4) वित्त आयोग

Chief Ministers of all the States are ex-officio members of the

(1) Planning Commission
(2) National Development Council
(3) Interstate Council
(4) Finance Commission

---

**48.** संविधानातील मूलभूत हक्कांच्या तरतुदींचा मसुदा तयार करण्यासाठी स्थापन केलेल्या उप-समितीचे अध्यक्ष कोण होते ?

(1) राजकुमारी अमृता कौर
(2) एम. आर. मसानी
(3) जे. बी. कृपलानी
(4) हन्सा जिवराज मेहता

Who was the Chairman of the sub-committee formed to draft the Fundamental Rights provisions of the Constitution ?

(1) Rajkumari Amrita Kaur
(2) M. R. Masani
(3) J. B. Kripalani
(4) Hansa Jivraj Mehta

---

**49.** अनुच्छेद 51 अन्वये राज्य हे ____________ प्रयत्नशील राहील.

अ. आंतरराष्ट्रीय शांतता व सुरक्षेचे संवर्धन करण्यासाठी
ब. परराष्ट्र धोरणाचे संवर्धन व आंतरराष्ट्रीय संबंध कायम ठेवण्यासाठी
क. राष्ट्राराष्ट्रांमध्ये न्यायसंगत व सन्मानपूर्ण संबंध राखण्यासाठी
ड. आंतरराष्ट्रीय विवाद लवादाद्वारे मिटवण्यास प्रोत्साहन देण्यासाठी

(1) फक्त अ, ब, क
(2) फक्त अ, क, ड
(3) फक्त ब, क, ड
(4) वरीलपैकी सर्व

Under Article 51, the State shall endeavour to

A. Promote international peace and security
B. Promote foreign policy and maintain international relations
C. Maintain just and honourable relationships with other countries
D. Encourage settlement of international disputes through arbitration

(1) Only A, B, C
(2) Only A, C, D
(3) Only B, C, D
(4) All of the above

---

**50.** खालीलपैकी कोणते विधान, केंद्र-राज्य संबंधांमधील भारतीय वित्त आयोगाच्या भूमिकेचे योग्य स्पष्टीकरण करते ?

(1) तो राष्ट्रपतींना राज्यांमधील पाणी तंट्यांसंबंधी सल्ला देतो.
(2) तो राज्यांच्या कर्ज घेण्याच्या अधिकारांचे वाटप करतो.
(3) तो केंद्र आणि राज्यांमध्ये कर महसूल वाटप करण्याची शिफारस करतो.
(4) तो केंद्र पुरस्कृत योजनांच्या अंमलबजावणीवर देखरेख करतो.

Which of the following statements correctly explains the role of the Finance Commission of India in Centre-State relations ?

(1) It advises the President on inter-state water disputes.
(2) It allocates the borrowing powers of the States.
